Vol 4 Issue 10 April 2015 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts ISSN 2231-5063 Impact Factor : 3.4052(UIF)
Volume-4 | Issue-10 | April-2015 Available online at www.aygrt.isrj.org

# संत तुकारामांच्या साहित्याविश्वातील अस्तित्ववादी व मनोविश्लेषणात्मक समालोचन



डॉ. मीरा शेंडगे
प्राचार्या – कुचन प्रषाला कनिष्ठ महाविद्यालय सोलापूर.

Co-Author Details :



**निबंधसार :**
प्रस्तुत शोधनिबंधाद्वारे तुकारामांच्या काव्यातून प्रतित होणाऱ्या दुष्काळाचा अस्तित्त्ववादी व मनोविश्लेषणात्मक दृष्टीकोणातून वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

या शोधनिबंधात संत तुकारामांच्या काव्यशैलीचा धावता आढावा घेऊन त्यातील प्रामुख्याने दुष्काळ चित्रणांचा आशय समजून घेण्याचा प्रयत्न आहे. तुकारामांच्या साहित्यातील 'दुष्काळाचे नेमके स्थान समजून घेण्याकरता दुष्काळ-अनुषंगाने तुकारामांचे मनोव्यापार व मनोविश्व समजून घेणे महत्वाचे ठरते.

तुकारामांचे मनो- विश्लेषण मांडण्यासाठी आस्तित्त्ववाद व फ्रॉइडच्या मनोविश्लेषण या सिद्धांन्तांचे परिप्रेक्ष्य निवडले आहे. अस्तित्त्ववादामधील अनुभवाचे कंसीकरण (bracketing) ही हुसरेल यांची संज्ञा तसेच मनोविश्लेषणा मधील फ्राइड यांनी मांडलेले विरोधात्मक प्रेरणाव्दय 'जीवन' व 'मृत्यु' (आदिप्रेरणा) या संज्ञांच्या आधारे तुकारामांच्या काव्यप्रतिमेचे समालोचन केले आहे.

दुष्काळाच्या अनुभवातून अदम्य आत्मप्ररणेने उभे राहून तुकोबारायांनी मराठी काव्यजगतासाठी जो अदभुतरम्य ठेवा ठेवला आहे व मराठी लोकमानसात जे अढळ स्थान निर्माण केले आहे. त्यांची ओझरती आलोचना येथे मांडली आहे.

**अभ्यासपद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधामधील निष्कर्षापर्यत पोहोचण्यासाठी प्रमुख्याने वाचन, मनन, चिंतन या शोधतंत्राचा अवलंब केला आहे. तसेच मानवी जगात अनुभवास येणाऱ्या मनोव्यापारांचा प्रत्यक्ष अनुभव येथे आधार म्हणून वापरला आहे. या संपूर्ण अभ्यासासाठी ज्या ग्रंथाचा उपयोग झाला त्यांची सूची अखेरीस नमूद केली आहे.

**1. उपोदघात :**

'काव्यानुभव' हा मानवी जगतातील एक नितांत निखळ व उदात्त असा सौंदर्यानुभव आहे. या अनुभवाकडे निरनिराळया दृष्टीकोनातून पहाता येते. तसेच त्याचे निरनिराळया प्रकारे रसग्रहण करता येते.

मराठी कवितेबद्दल बोलावयाचे झाल्यास या कवितेला फार प्राचीन, प्रदीर्घ व दैदिप्यमान अशी परंपरा लाभली आहे.

'अमृततेही पैजा' जिंकणारी ज्ञानोबा माऊलींची मराठी ओवी त्यांच्याही आधी होऊन गेलेल्या आद्य कवी मुकुंदराजांपर्यंत आपली वाट सांगते. याच काव्य-सौंदर्य वाटेवरचा वारकरी संप्रदायातील कौस्तुभमणी ठरलेला कवी म्हणजे 'संत तुकाराम'.

### *2. तुकारामांच्या काव्यशैलीची वैशिष्टये :*

प्राचीन महाराष्टऊामध्ये पूर्वापार रुढ झालेली अभंग ओव्यांची काव्यरचना तुकारामांनी अनुभव आविष्कारासाठी अंगिकारली आहे. तुकारामांच्या सिद्धहस्त लेखणीतून ही रचना पूर्णत्त्वाला गेल्याचे आढळून येते. विलक्षण गेयता, सरलता, लवचिकता, थेटपणा ही त्यांच्या काव्यशैलीची काही वैशिष्टये म्हणावी लागतील. छंदांचे, नादमयतेचे अनेक प्रयोग तुकोबांनी समर्थपणे केलेले दिसून येतात. तसेच अत्यंत चपखल, भावस्पर्शी उपमारुपकांचे अपूर्व अलौकीक विश्व गाथेमध्ये ठायी ठायी प्रकटतांना दिसते.

या सर्वांवर कडी म्हणजे, मानव जातीमध्ये निरंतन वसत असलेल्या सर्व विरोधाभासांच्या पल्याड जाऊन कोणाच्याही हृदयात थेट प्रवेश करण्याचे विलक्षण सामर्थ्य तुकोबांच्या काव्याविष्कारामध्ये आढळून येते. ज्ञानपीठ पुरस्कार विजेते डॉ. भालचंद्र नेमाडे तुकोबांच्या काव्यशैलीविषयी फार मार्मिक पणे लिहीतात त्यांच्याच शब्दात सांगायचे झाल्यास,

''तुकारामांच्या कित्येक अभंगाची एकदोन चरणे म्हणीसारखी वापरली जातात, कित्येक अभंगातील एखादी ओवी मानवी आस्तित्त्वाचे मनोहर आकलन दर्शवते ...... मराठी भाषेचा सर्वोत्तम अर्थविलास तुकारामाच्या या अभंगामध्ये सापडतो''. (संदर्भ १)

प्रस्तुत निबंधामध्ये मात्र आपण, काव्यशैलीवर ओझरते भाष्य करुन, प्रामुख्याने तुकोबांच्या दुष्काळसंबंधीच्या अनुभवाकडे व त्यांनी लावलेल्या या प्रगल्भ अनुभवाच्या अन्वयर्थाकडे लक्ष केंद्रित करणार आहोत.

### *3. तुकारामांच्या काव्यसृष्टीमधून प्रकट होणारा दुष्काळ :*

तुकोबांचे अवघे ४२ वर्षांचे आयुष्य, तसेच त्यांचा लौकीक व चरित्र सर्वश्रुत आहे. म्हणूनच त्यातील तपशीलांकडे न वळता आपण प्रामुख्याने तुकारामांच्या अभंगामधील दुष्काळ चित्रणावर भर देणार आहोत. कारण या दुष्काळ चित्रणातुनच तुकोबांचे वैराग्य व भक्ती फुललेली आढळून येते.

तुकोबारायांच्या अभंगसंपदेमध्ये ठायी-ठायी भीषण दुष्काळाचे व्याकुळ करणारे वर्णन येते. त्यांच्या या वर्णनाला दुजोरा देणारी वर्णने इतर संतांच्या साहित्यातही आढळून येतात. (संदर्भ २)

उदा. अन्नासाठी दाही दिशा । आंम्हा फिरविसी जगदीशा..... (संदर्भ ३)

१६२८-३० मध्ये दख्खनमध्ये अतिभीषण दुष्काळ पडला. नेमक्या याच दुष्काळाच्या अनुभवातुन तुकारामांच्या आयुष्याला संपूर्ण कलाटणी मिळाली. तुकारामांचा कायापालट झाला. ... नव्हे त्यांच्या पुनर्जन्म झाला. हया दुष्काळाबद्दल लिहिताना डॉ. पुष्पलता शेटये म्हणतात, ''......दुष्काळ आता अक्राळ विक्राळ रुप धारण करुन तुकारामांच्या घरात शिरला. घरात सोने, नाणे, धन सर्व होते पण त्यांच्या बदल्यात कुणी अन्नाचा कणही देऊ शकत नव्हते. सोने-चांदी चावून पोट भरता येईना'' तुकाराम महाराज म्हणून गेले -

''दुष्काळे आटिले द्रव्ये नेला मान। स्त्री एकी अन्न अन्न करिता मेली।'' (संदर्भ ४)

### *4. तुकोबारायांच्या दुष्काळ अनुभवाचे अस्तित्त्ववादी व मनोविश्लेषणात्मक विवरण :*

तुकोबांचा दुष्काळ विषयक अनुभव व त्यांचे अभंग गाथेमध्ये उमटलेले चित्रण, त्यांच्या अस्तित्ववादी व मनोविश्लेषणात्मक आलोचने साठे पुढील काही अभंग व अभंग खंड निवडले आहेत. ते असे...

१) बरे जाले देवा निघाले दिवाळे। वरी या दुष्काळे पीडा केली।।
अनुतापे तुझे राहिले चिंतन । जाला हा वमन संवसार।।
बरे जाले देवा बाईला कर्कशा। वरे हे दुर्दशा जनामध्ये ।।
बरे झाले जगी पावलो अपमान । वरे गेले धन ढोरे गुरे।।
बरे झाले नाही धरिली लोकलाज। वरा आलो तुज शरण देवा।।
बरे झाले तुझे केले देवाईल। लेकरे बाईल उपेक्षिली।।
तुका म्हणे बरे व्रत एकादशी। केले उपवासी जागरण।।

२) बाप मेला न कळता। नव्हती संसाराची चिंता ।।
विठो तुझे माझे राज्य। नाही दुसऱ्याचे कान।।
बाइल मेली मुक्त जाली । देवे माय सोडविली।।
पोर मेले बरे जाले। देवे मायविरहित केले।।
मला मेली मज देखता।। तुका म्हणे हरली चिंता।। (संदर्भ ५)

आधुनिक व आधुनिकोत्तर काळात, काव्यसमीक्षा शास्त्रामधील, अस्तित्त्ववादी व मनोविश्लेषणात्मक समीक्षा, हे दोन अतिशय महत्वाचे समीक्षाप्रवाह ठरले आहेत. यापुढील समीक्षेसाठी आपण हीच दोन परिप्रेक्ष्ये निवडली आहेत.

### *4.1 अस्तित्ववाद व कंसीकरणाचा सिद्धांत :*

१६२८-३० साली दख्खन मध्ये होऊन गेलेल्या अति व भीषण दुष्काळामध्ये उभा महाराष्टऊ होरपळून निघाला. याबाबतीत

नेमाडे लिहितात, ''रस्तोरस्ती माणसांच्या प्रेतांचे खच पडलेले पाहिल्याचे तत्कालीन परदेशी प्रवाशी लिहितात. त्यानंतर रोगराई आली. कोल्हे लांडगे माणसांना खाइा लागले.''

हजारो जनांनी ही अस्मानी आपत्ती निधडया छातीने झेलली. पण या हजारो जनांमधून केवळ एक आणि एकच तुकोबा निर्माण झाला. तुकोबारायांमध्ये मूळातच असलेल्या अलौकिक प्रतिभाशक्तीमुळे व त्यांच्या कौटुंबिक परंपरेतून आलेल्या खास आध्यात्मिक मनोभूमिकेमुळे तुकोबांनी या अस्मानी संकटाकडे फार निराळेपणाने पाहिले. त्यांनी दुष्काळाची आपत्ती नुसती झेलली नाही तर शिवधनुष्याप्रमाणे ती पेलली व त्यातून निघालेले अभंगरूपी वाग्बाण ते मराठी जगताकरता ठेवून गेले.

- हे अदभुत नेमके कसे घडले ?
- दुष्काळ ही घटना त्यांच्या आयुष्यातील साक्षात्कारी घटना का ठरली ?

दुसऱ्या शब्दात विचारायचे झाल्यास, दुष्काळ या घटनेचा तुकारामांनी नेमका कोणता अन्वयार्थ लावला? अस्तित्ववाद व घटना विज्ञानवादी तत्वज्ञानाचे जनक Edmund Hussrel, यांच्या सिध्दान्ताव्दारे आपण दुष्काळ व तुकाराम या गोष्टींकडे काही वेगळेपणे पाहू शकतो का? हे आपण आता तपासून पहाणार आहोत.

हुसरेल यांच्या मते, अनुभवाच्या अन्वयार्थामध्ये महत्व असले ते जाणीवेच्या आशयाला वस्तूला नव्हे. एखादा अनुभव घेताना मनुष्य ज्या वेळेस त्या अनुभवाच्या अवतीभवती असलेले परंपरांचे, विज्ञानाचे, धार्मिकतेचे, व्यक्तीगततेचे सर्व पापुद्रे बाजूला काढून केवळ आणि केवळ 'तो अनुभव', आपल्या मनात उतरु देतो तेंव्हाच त्यातून तो काही अस्सल निराळा अर्थ काढू शकतो, इतिहासात ठायी-ठायी आपल्याला या सत्याचे दाखले सापडतात.

'जरा', 'मृत्यू' हे मानवजातीला नवीन नव्हेत. पण सिध्दार्थाने ज्यावेळेस, ;हुसरेल यांच्या सिध्दान्तानुसारद्ध अत्यंत निराळेपणे ही आर्यसत्ये अनुभवली व जो काही सच्चा, प्रतिसाद त्यांना दिला त्यामुळे सिध्दार्थाचे भगवान बुध्द झाले.

भारतीयांच्या हाडीमासी खिळलेली स्पृश्यास्पृश्यता डॉ. भीमराव आंबेडकरांच्या मनात ज्याप्रमाणे उतरली त्यातून भारताची 'घटना' तयार झाली.

नेमके असेच काहीसे तुकारामांच्या बाबतीत घडून आलेले जाणवते. अस्तित्ववादी परिभाषेत बोलायचे झाल्यास, अत्यंत दारुण असा व्यावहारीक पातळीवरील दुष्काळ फार निराळेपणाने तुकारामांच्या मनात उतरला. परंपरेचे, समाजभितीचे, धर्माचे सगळे सगळे पापुद्रे दूर करुन त्यांनी 'दुष्काळ' एका निःसंग पातळीवर सच्चेपणाने अनुभवला. या अनुभवाला त्यांच्या मनामध्ये आध्यात्मिक उब मिळाली व ते विरागी झाले. या विषयी तुकारामांचे चरित्रकार बोंद्रे लिहितात, ''त्यांनी जी हृदयस्पर्शी दृश्ये पाहिली त्याचाही परिणाम त्यांच्यावर झाल्याने त्यांस संसारातील असारता स्पष्टपणे भासू लागली.'' (संदर्भ ७)

चोखपणे साहुकारी करणाऱ्या तुकोबारायांनी जनतेचे गहाण रोखे नदीमध्ये बुडवून टाकले यापरते वैराग्य ते काय असू शकते ?

नेमाडे तुकारामांच्या या परिस्थितीतील मनोव्यापाराबदद्ल लिहितात, ''अशा परिस्थितीतली तुकारामंच्या मनाची तडफड दुरूस्वप्नासारखी नंतरच्या काळात लिहिलेल्या काही अभंगामधून सतत उमटते. ही आजन्म अस्वस्थता त्यांचा स्थायीभाव होवून राहिली.'' (संदर्भ 8) दुष्काळ परिस्थितीला तुकारामांनी दिलेला प्रतिसाद हा असा निरूसंग व अस्वस्थ होता.

हुसरेल यांच्या घटनाशास्त्रवादी विश्लेषणाचा धागा पकडून दुसरे अस्तित्ववादी तत्वज्ञ हायडेगर म्हणतात की, सहसा कोणताही अनुभव मनुष्य त्याच त्या पारंपारिक चौकटीतून घेत असतो व त्यामुळेच तो अनुभव खऱ्या जाणीवेच्या कक्षेतून सुटून जातो. पण ज्यावेळेस एखादी व्यक्ती स्वत्वाची जाणीव ठेवून आपल्या अंतरात्म्याच्या साक्षीनुसार जगते तेंव्हा मात्र तो अनुभव काही निराळाच होतो व ते मानवी अस्तित्व विशेष अस्सल ठरते. त्या अनुभवाचा नेमका गाभा त्या व्यक्तिला गवसतो व त्यातून निर्माण होणारा प्रतिसादही तितकाच अस्सल ठरतो. अशा खऱ्याखऱ्या आशय धन, सत्व, घन अस्तित्वाला हायडेगर यांनी केंमपद ही जर्मन संज्ञा वापरली आहे.

सर्वसामान्य जगण्यात अनुभवाची जातकुळी, त्यावरचे प्रतिसाद सर्व काही आधीच ठरलेले असते. ते प्रतिसाद सरधोपट असतात व त्यात मनुष्याचा कोणताच कस लागत नाही. परंतु सत्वघन अस्तित्वामध्ये मात्र 'मी', मनुष्य म्हणून अमूक एका परिस्थितीमध्ये सच्चेपणाने कसा जगतो व त्या जगण्याने माझ्या अस्तित्वाला नेमका कोणता अर्थ प्राप्त होतो याला महत्व येते. हे दिव्य मनुष्यास कठोरपणे साधावे लागते व हया संपूर्ण आत्मिक यातायातीमध्ये मनुष्याचा खरा कस लागत असतो. (संदर्भ ९) पुन्हा नेमाडयांच्या भाषेत सांगायचे झाल्यास, ''तुकाराम ;संसारातीलद्ध सुरक्षिततेची भावना नष्ट झाल्यावर चिरंतन असा काही आधार कुठे सापडतो का याचा जीव तोडून शोध घेऊ लागला.'' (संदर्भ १०) 'परंपरेचे, संस्कृतीचे व वैयाक्तिकचे, सर्व पापुद्रे बाजूला करुन, तुकारामांनी दुष्काळ अनुभवला. (Bracketing) अंगीभूत प्रतिभा व कठोर आत्मपरिक्षणाद्वारे त्यांनी सत्वधन पातळीवर दुष्काळाला कवटाळले व त्यातूनच वैराग्याचा सच्चा प्रतिसाद उमटला. विरागी वृत्ती अंगिकारुन त्यांनी कवित्वाला आपला प्राण बनविले.

आपले स्वत्व पणाला लावून नवीन तुकाराम घडल्याचे जाणवले. या सर्व ;दुष्काळ निगडीतद्ध अनुभव मंथनामुळे, मनुष्यत्वाच्या पार पल्याड जावून देवत्वाची खूण तुकोबांच्या ठायी कायमची आल्याचे दिसते. अस्तित्ववादी विचारवंत सोरेन किर्कगार्ड ज्याला केंमपद ला सत्वघनतेला. दिलेला श्रध्दाधिष्टित प्रतिसाद म्हण्तो, नेमका तसाच प्रतिसाद तुकाराम दुष्काळास देतात व म्हणतात.

''देवाची ते खूण आला ज्याच्या घरा ' त्याच्या पडे चिरा मनुष्यपणा ''

असा हा सत्वघन प्रतिभासंपन्न प्रतिसाद देताच तुकारामांच्या मनामध्ये नेमके कोणते कल्लोळ होते. कोणती द्वंद्वे होती, हे समजून घेण्यासाठी आपण आता फ्राईडच्या सिध्दान्ताकडे वळू या.

### 4.2 फ्राईडच्या मनोविश्लेषण सिध्दान्त व तुकारामांचा सत्वघन( दुष्काळ) अनुभव.

आधुनिक मनोविश्लेषण शास्त्राचे जनक डॉ. सिग्मंड फ्राईड यांनी मानवी मनाची तुलना हिमनगाशी केली आहे. माणसाच्या ‘बोध’ व ‘अबोध’ मनाची संकल्पना मांडून त्याने मानवी जगाला चकित करुन सोडले. मानवी अबोध मनात दडलेल्या अंधाऱ्या गुहांचा वेध फ्रॉईडने अनेक आदिबंधाच्या द्वारे घेतला. यातीलच एक महत्वाचे विरोधात्मक आदिबंध द्वंद्व म्हणजे (Eros/life) व (Thanedus/Death अर्थातच (जीवन व ‘मृत्यु’) (‘संहार’ व ‘सृजन’,) अथवा (‘प्रेम’ व ‘द्वेष’,) हे प्रेरणा द्वय फ्रॉइड यांच्या मते मानवी मनामध्ये या दोन आदिम विरोधाभासी प्रेरणांमध्ये सतत द्वंद्व सुरु असते. कधी सृजन प्रेरणा, जीवन प्रेरणा प्रबळ ठरते तर कधी संहार वा मृत्यु प्रेरणा, हया सिध्दान्ताच्या प्रकाशात तुकारामांच्या दुष्काळ अनुभवाचे विश्लेषण आपण जेंव्हा करतो तेंव्हा काही गोष्टी जाणवतात त्या पुढीलप्रमाणे.-

कराल दुष्काळाचा अनुभव घेत असतांना त्यांच्या मनातील भावना कल्लोळात प्रामुख्याने ‘मृत्यू’ वा विनाश प्रेरणांचे थैमान सुरु असलेले दिसते. अतीव दुरूख, त्रागा, उद्वेग, हतबलता, नामुष्की, मानवी जीवनाच्या क्षणभंगुरतेची जाणीव, व्यावहारिक रितेपण अशी मनाची अनेक स्थित्यंतरे त्यांच्या अभंगातून प्रकटतात.

क्षणभंगुर संसार याचा भरवसा नाही ’

किंवा

ओस झाल्या दिशा मज भिंगुळवाणे ’ जिवलग नेणे मज कोणी ’’
भयवाटे देखे श्वापदाचे भार ’ नव्हे मज धीर पांडुरंगा ’’

पण ‘जीवन’ व ‘मृत्युच्या’ हया झगडयामध्ये ‘जीवनप्रेरणा’ कुठेतरी अधिक प्रबळ होते व त्यांचे मन वैरागी, अनासक्त व ईश्वरचरणी स्थिर होते. मानवी जीवनातील क्षणभंगुर आनंदाहून खूप निराळया असलेल्या शाश्वत, दैवी आनंदाच्या शोधार्थ निघते.

जीवेच्छा.. आहे त्याहून अधिक सत्वघन, अर्थपूर्ण जीवन जगण्याची प्रेरणा, मृत्युप्रेरणेवर मात करते व तुकारामांच्या मनाला भक्ती, श्रध्दा व काव्य यांत सांत्वना मिळते.

देवाची ते खूण आला ज्याच्या घरा ’ त्याच्या पडे चिरा मनुष्यपणा ’’
देवाची ते खूण सोडी मायाजाळ ’ आणि हे सकळ जग हरी ’’

ते ईश्वरभक्तीने विभोर होतात. फुलून येतात मानवी देहात शक्त असलेल्या सर्वोच्च मुक्तीच्या आनंदावा, अनुभवाला सामोरे जातात.. स्वतरूची अशी झेप पाहून आपणच कबुली देतात.

अणूरणिया थोकडा ’ तुका आकाशाएवढा ’’
मानवी मनाच्या व मानवी जीवनाच्या सर्व विसंगतींच्या पलिकडे ते जातात.

### 5. समालोचन..

खरे तर, दुष्काळाच्या आघतापासून सुरु झालेला त्यांच्या मनाचा प्रवास,
वेदाचा तो अर्थ आम्हांसी च ठावा ’ येरांती व्हावा भार माथा ’’
.. असा विलक्षण आत्मविश्वासाचा वळसा घेउन अखेरीस,
आनंदाचे डोही आनंद तरंग ’ आनंदची अंग आनंदाचे ’’

अशा अनंताच्या वाटेवर येऊन ठेपतो. तुकोबारायांचा हा मनोप्रवास आपल्याला निव्वळ थक्क करुन सोडतो.

प्रत्यक्ष जगताना ‘‘भले तेंचि देऊ कासेंची लंगोटी नाठाळाचे माथी हाणू काठी’’

अशी कठोर नीति अंगिकारणारे तुकोबा, जे का रंजले गांजले ’ त्यासि म्हणे जो आपुले ’’ तोचि साधू ओळखावा ’ देव तेथेचि जाणावा’’ असे मऊपणाचे बोल बोलतात. थोडक्यात काय तर त्यांच्या अभंगांमधून मानवजातीप्रती करुणेने ओथंबलेल्या मनाचा जसा प्रत्यय येतो तसाच अतिशय स्वच्छ पण कणखर नैतिक भूमिका घेणाऱ्या एका अवाढव्य आंतरिक बळ असलेलया व्यक्तीमत्वाचाही प्रत्यय येतो.

आपल्या प्रतिभेद्वारे, अभंग संपदद्वारे, तसेच चरित्र संदेशाद्वारे, मराठी मनास, समाजास आणि महाराष्ट्रभूमीस त्यांनी कायमचे ऋणी करुन ठेवले आहे.

दिलिप चिरयांसारख्या विद्वानाने तुकाराम इंग्रजीत नेझन संपूर्ण आधुनिकोत्तर जगासही तुकारामांची ओळख घडवून दिली आहे.

तुकोबारायांचा हा प्रतिभा ठेवा इतका महत्तम विलक्षण आहे की, आज जवळ जवळ पावणे चारशे वर्षानंतरही आपल्याला त्यांची कविता जवळची वाटते. तुकोबारायांचे ठळक योगदान आपल्याला काहीसे पुढीलप्रमाणे मांडता येईल.

### 5.1 योगदान

तुकोबा म्हणजे मराठी लोकमानसाच्या पैसातील मध्यवर्ती खांब.

कार्ल हयुंग या थोर मनोविश्लेषण शास्त्रज्ञाच्या मते जसे प्रत्येक व्यक्तीचे जाणीवे नेणिवेचे मन असते त्याचप्रमाणे प्रत्येक समाजमनाचा स्वतरूचा खास असा जाणीवे नेणिवेचा 'पैस' असतो. तुकोबारायांचे अभंग मराठी जनमानसाच्या पैसात मध्यवर्ती खांबासारखे उभे आहेत. दिवसभरांच्या काबाडकष्टावरील उतारा म्हणून खेडयापाडयातील मराठी जनता तुकोबांच्या अभंगात आजही तल्लीन होते. या अभंगामध्ये जनतेच्या जीवाला सांत्वना (Solace) मिळते.

### • दिपकालाची बंधने पार करणारी कविता :

दिपकालाची संस्कृतीची सर्व बंधने पार करुन कोणाही संवेदनक्षम माणसाच्या मनात तुकारामांची कविता स्थान निर्माण करते. म्हणूनच १८६६ साली त्यांचा निःस्सीम भक्त सर अलेक्झांडर ग्रँट (इंग्रज अधिकारी) याला तुकोंबांची महती कळते व तो गाथेची पहिली मुद्रित प्रत तयार करतो.

याचाच अर्थ मानवी विश्वातील सर्व स्तरांमध्ये तुकाराम तेवढेच थेट पोहचतात ते जसे खेडोपाडी आपलेसे वाटतात तसेच लेखक कवींनाही आपलेसे वाटतात तर विद्वज्जन अनेक ठिकाणी तुकोबांच्या अभंगाचे दाखले देण्यात धन्यता मानतात.

### • भाषेमध्ये रुजून आलेले काव्य :

तुकोबांची अनेक वचने ही आज मराठीत वाकप्रचार, म्हणी म्हणून रुळली आहेत.

उदा. निंदकाचे घर, असावे शेजारी...., इ.

अगदी एका वाक्यात सांगायचे झाल्यास नेमाडे म्हणतात त्याप्रमाणे तुकाराम झाले नसते तर मराठी भाषा दरिद्री राहिली असती एवढे मात्र खरे. फार थोडया भाग्यवंत कवींना असे आढळपद मिळते. हिंदी मधील कबीर, राजस्थानी बोलीतील मीरा व मराठीतील तुकाराम हे असे काही थोर भाग्यवंत होते.

### • अर्थघनतेची देन :

असे म्हटले जाते की, न्यायमूर्ती रानडे तुकोबारायांचे अभंग म्हणताना कमालीचे सदगंदित होत असत हा व्याकुळतेचा अनुभव तुकोबारायांच्या सानिध्यात आजही अनेकांना येतो. हयाचे प्रमुख कारण म्हणजे त्यांच्या काव्यात ओतप्रोत भरलेला मानवजाती विषयी सच्चा कळवळा व आस्था. ही करुणा, आस्था त्यांच्या अतीव  व अर्थपूर्ण प्रतिमा शैलीतून प्रकाशात राहते. म्हणूनच वेळप्रसंगी हीच मजा अत्यंत परखड, सडेतोड होऊन जाते. अशी अर्थघन शैली ही तुकोबांची विलक्षण देण आहे.

## ६. उपसंहार :

तुकारामांचे संपूर्ण आयुष्य सततच नानाविध प्रकारच्या झगडयांनी वेधलेले दिसते. म्हणूनच ते 'रात्रंदिन आंम्हा युद्धाचा प्रसंग ... असे म्हणतात. अर्थात त्यांच्या संपूर्ण जीवनाला व्यापून उरलेल्या या लढयाची पाळेमुळे मात्र त्यांनी दुष्काळाशी मांडलेल्या लढाईत सापडतात. पण हया झगडयांनी खचून न जाता ते आपल्या विलक्षण जीजिविषेने या खर्चावर मात करतात. तुकोबाराय त्यांच्या वाटेला आलेली प्रचंड कटुता निव्वळ आत्मबलाच्या जोरावर कांचनासारख्या अस्सल झळझळीत काव्यानुभवामध्ये परावर्तित करतात. कटुतेचे रुपांतर निरंजन गोडव्यात करतात.

नैसर्गिक असोत वा मानवनिर्मित ........ पण मानवी जीवन पहा कसे विरोधभासांनी भरलेले आहे. ....

अगदी आपल्या काळातील उदाहरणे घेऊन बोलायचे झाल्यास ... भारत/पाक फाळणी हे दुदैवच होते. पण हयाच फाळणीच्या दाहकखायी मध्ये आपल्याला अमृताप्रितम आणि गुलजार सारखे अनमोल हिरे सापडले.

दख्खनने १६३० साली भोगलेला दुष्काळ भीषण होता, हे कोण बरे नाकारेल? पण याच दुष्काळाला तुकारामांनी, आणि तुकारामांना दुष्काळाने मराठी साहित्यात अजरामर केले, हे सुध्दा नाकारता येत नाही.

किंत्येक पंडीत, पंत, महंत, आधुनिक, विद्रोही, प्रेमकवी आले आणि गेले......... पण कालनदीतून तुकारामांची गाथा आजपर्यत तरंगत आहे.

अशा हया साक्षात अभंग तुकाराम घडविणाऱ्या दुष्काळाचे मराठी साहित्यातील अद्वितीय स्थान, व तुकारामांचे मराठी पैसातील पथदर्शी ताऱ्यासारखे असलेले अढळपद..... असेच अखंड व निरंतर  राहील.................

हे सत्य कोण बरे नाकारु शकेल?

.................

### संदर्भसूची :

१. तुकाराम गाथा – (निवडक अभंग) संपादक – भालचंद्र नेमाडे, साहित्य अकादमी प्रकाशन २००४. संदर्भ : प्र.क्र.।२. संत तुकाराम चरित्र लेखक : ह.भ.प.ल.रा पांगारकर, प्रकाशक ह.अ.भावे. सष्टें. १६२०. संदर्भ पृ.क्र. १६

३. संत तुकाराम व्यक्तिमत्व आणि कवीत्त्व : डॉ.पुष्पलता शेटये, मनोरमा प्रकाशन १६६८.  पृ.क्र. २६.

४. संत तुकाराम व्यक्तिमत्व आणि कवीत्त्व : डॉ.पुष्पलता शेटये, मनोरमा प्रकाशन १९९८. पृ.क्र. २९
५. तुकाराम गाथा – (निवडक अभंग) संपादक – भालचंद्र नेमाडे, साहित्य अकादमी प्रकाशन २००४. संदर्भ : पृ.क्र.५
६. तुकाराम गाथा – (निवडक अभंग) संपादक – भालचंद्र नेमाडे, साहित्य अकादमी प्रकाशन २००४. संदर्भ : प्र.क्र-VII
७. संत तुकाराम व्यक्तिमत्व आणि कवीत्त्व : डॉ.पुष्पलता शेटये, मनोरमा प्रकाशन १९९८. पृ.क्र. २९.
८. तुकाराम गाथा – (निवडक अभंग) संपादक – भालचंद्र नेमाडे, साहित्य अकादमी प्रकाशन २००४. संदर्भ : प्र.क्र.VII
९. आपले विचारविश्व – के.र.शिरवाडकर, राजहंस प्रकाशन २०१०.पृ.क्र.१७८, १७९.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org